# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

**( निवडणूक विभाग )**

ई-मेल :- com.chandrapur@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्र. **०७१७२-२५०२२०, २५५६५०**


**जावक क्र. चंशमनपा/निवडणूक/२०२५/** ३६०९ **दिनांक :-** ०५ /१२/२०२५

## -: जाहिर सूचना :-

### चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

### प्रारूप मतदार यादी बाबत प्राप्त आक्षेप अर्जांची सुनावणी

ज्याअर्थी, मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई महाराष्ट्र यांचे कार्यालयीन पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक - २६/११/२०२५ अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करिता प्रारुप मतदार यादीवर दिनांक - २०/११/२०२५ ते ०३/१२/२०२५ पावेतो प्राप्त होणाऱ्या हरकती व सुचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी तयार करण्याबाबत आदेशीत करण्यांत आले आहे.

त्याअर्थी, चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या प्रभाग क्र. १ ते १७ करिता प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप मतदार यादी बाबत प्राप्त हरकती व सुचनांवर दिनांक ०५/१२/२०२५ ते ०७/१२/२०२५ पावेतो मनपाचे मुख्य कार्यालय, गांधी चौक, चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत सुनावणी घेवून नियमाप्रमाणे आक्षेप निकाली काढण्यांत येत असून, आक्षेप कर्त्यांस याद्वारे सूचित करण्यात येते की, दिनांक - ०५/१२/२०२५ ते ०७/१२/२०२५ पावेतो सादर केलेल्या आक्षेपांवर सुनावणी करिता आवश्यक पुराव्यासह उपस्थित राहण्यांत यावे.

तसेच निवडणूकीचे काम हे कालमर्यादीत असल्यामुळे उक्त दिनांका नंतर कोणत्याही हरकती व सूचनांचा सुनावणी करिता विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/१२/२०२५

ठिकाण :- चंद्रपूर.

**(संदिप चिद्रवार)**
उपायुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

एक प्रत ....दै. तरुण भारत, दै. महाविदर्भ.... यांचे कडे प्रसिध्दीसाठी पाठविण्यांत येत आहे. जाहिर सूचना कमीत - कमी ( १२ सेंमी x १५ सेंमी ) **दिनांक ०६/१२/२०२५** ला प्रसिध्दी करावी. जाहिर सूचना प्रसिध्दी बिलाचे भुगतान शासकिय दराने करण्यांत येईल. पालिकेचा जिएसटी क्रमांक - GSTIN:27AAALC1112H1ZS बिलात नमूद करुन बिलासोबत पेपरच्या तिन प्रति व दर प्रमाणपत्र आदेश पत्र जोडावे.

OK
05/12/25

DAILY MAHAVIDARBHA CHANDRAPUR
5/12/2025

**(संदिप चिद्रवार)**
उपायुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

Computer-1\D:\Election 2025-26**All letter-ISM 6**.doc